# साष्टी/ठाण्याचा पहिला स्वातंत्र्यसंग्राम

पहिली आवृत्ती

संकलक
चंद्रकांत शहासने
(देशभक्तकोशकार)
मो.क्र. - ९८८१३७३५८५

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या सौजन्याने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

पुस्तकाचे नाव : आष्टीचा पहिला स्वातंत्र्यसंग्राम
संकलक : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार) पुणे
मो.क्र. – ९८८१३ ७३५८५
प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.
प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती
मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७
पुस्तकाचे हक्क : ॲड. नंदिनी शहासने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

मूल्य : रूपये ३०/–
संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली–वाई
९८५०५ ०९४१६
श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी–पुणे
९८५०३५१०३५

Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर माफीस प्राप्त आहेत.
No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010

# गंगाजी नाईकांचा पहिला करार

# इ.स. १७२०



**पहिला करार :** इ.स. १७२० मध्ये गंगाजी नाईक आणि बाजीराव पेशवे यांच्यात करार झालेला दिसतो. करार उपलब्ध नाही परंतु इतरसाधनांवरून कांही तरी करार झाला होता हे सिद्ध होते. हा करार निरनिराळ्या राजे बादशहा किंवा युद्धानंतरच जितजेते ह्यामध्ये होणाऱ्या कराराप्रमाणे नव्हता. देश स्वतंत्र करण्याच्या वेडाने पछाडलेल्या लोकनायकांत व त्यास मदत करण्याचे मान्य असलेल्या बलाढ्य राजसत्ताधाऱ्यांत हा करार झालेला होता. सत्ताधाऱ्यांने ह्या लोकनायकाला युद्धांत मदत करावी एवढाच हेतू या कराराच्या मागे होता. त्या जनतेच्या लोकाग्रणीने जनतेची मने मिळवावीत, उठावाची सिद्धता करावी. इकडचे हवे लागे, वाटा, रस्ते ह्यांचा पुरा बंदोबस्त करावा असा संकल्प त्या करारात होता. या मोहिमेपोटी तयारी करताना येणारा सर्व खर्च गंगाजीने करावा व पेशव्यांनी लढाईचा सर्व खर्च स्वतः करावा. मोहीम यशस्वी झाल्यावर सर्व वतने, शिळोत्रे ज्यांची त्यास पेशव्यानी सनदा करून द्याव्यात. आणि पेशव्यांनी हा मुलूख आपल्या राज्यास जोडावा असा ह्या कराराचा मुख्य भाग होता. एवढया मोठ्या लढाईची सर्व पूर्वतयारी करणे सामान्य नव्हते, पण त्याशिवाय दुसरा पर्याय नसल्यामुळे गंगाजीनी ही अट मान्य केली. पेशव्यांच्या ह्या अटीने गंगाजीला कर्जाचे खाईत उतरावे लागले. परिस्थिती बिकट होती. पेशवे मोठे धूर्तपणे प्राथमिक खर्चातून बचावले गेले होते. गंगाजीना मात्र १७२० ते १७३९ पर्यंत अव्याहत खर्च करावा लागला. त्यांना फार मोठे कर्ज ह्या अव्यवहार्य अटीमुळे झाले. राज्य मिळविणाऱ्या सत्तेने हा सर्व खर्च करावयास पाहिजे होता कारण जिंकल्यावर त्यांना मुलुख मिळणार होता. मुलूखाचे कराचे उत्पन्नातून त्यांना खर्च निघणारा होता. जिंकल्यावर गंगाजींना त्यांचे कर्ज फेडण्यास कोणताही मार्ग नव्हता. अशा स्थितीत गंगाजींनी हा सर्व धोका पत्करला त्याने कारण फक्त देशप्रेम, लोकांना धर्म छळातून सोडविणे, लोकांची आर्थिक सोडवणुक करणे, धर्म वाचविणे, बाटवाबाटवी बंद करणे, देव देवालये मुक्त करणे असे उदात्त हेतू गंगाजींच्या या धाडसामागे होते.

# साष्टीचा / ठाण्याचा पहिला स्वातंत्र्य संग्राम

**मोरगावास जाण्यास गंगाजी नाईक पायी निघाले. त्यावेळी सर्वांनी मोठ्या प्रेमाने त्यांना निरोप दिला. अणजूर ते मोरगांव अंदाजे १४३ मैल आहे. त्यांनी आपल्या भावंडांना निर्धाराने सांगितले की, मी देहाचा संकल्प करून जात आहे. परमेश्वराने आपले पाय दाखवून सुखाचा सोहळा, महाराष्ट्र धर्माची व महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तर उत्तम, ह्या जन्मी त्याची प्राप्ती झाली नाहीतर पुढील जन्मी त्याची सेवा करून हेच कार्य करीन. कार्यात यश आले तर स्वराज्याचा स्वार्थ साधेल, नाही आलेतर मृत्युनंतर परमार्थ व किर्ती मिळेल. श्री समर्थांनी असाच उपदेश महाराष्ट्रास केला होता. 'मरणहाक तो चुकेना। देह वाचविता वाचेना। विवेकि होऊन समजाना। काय करावे।' जर मरण टळत नाही तर मग मरून किर्ती रूपाने का जगू नये?**

पोर्तुगीजांनी गोव्यानंतर साष्टीत आपली सत्ता स्थापण्यास सुरुवात केली. इ. स. १५३३ मध्ये वसई व ठाणे येथे बाटवाबाटवी, धर्मछळ करणे, फटके मारणे, धर्मांतर न करणाऱ्यांना तेलाची डगली घालून जाळून ठार मारणे, असे प्रकार वाढत गेल्याने लोक या प्रकाराला कंटाळून काहींनी स्थलांतर केले तर काहींनी मृत्युच्या भितीने धर्मांतर केले. वांद्रे येथे चर्चेस बांधली गेली. स्थलांतरीतांमध्ये ब्राह्मण, चांद्रसेनिय कायस्थ प्रभू, पाठारे प्रभू, पाचकळशी, भंडारी वगैरे जातीचे लोक होते. समुद्र किनाऱ्यावरील कोळी लोक नाईलाजाने कॅथलिक धर्म स्विकारते झाले.

वसई, ठाणे येथे गुजराथच्या बहादूर शहाचा अंमल होता. व्यापाराचे निमित्त करून गोड बोलून त्याला पोर्तुगीजांनी जहाजावर बोलावले. बादशहाचा सन्मान केला व सोन्यारुप्याची तबके भेट म्हणून सादर

केली. ते पाहून बादशहा हुरळून गेला. पण त्याला काय ठाऊक आपणास कत्तल करणार आहेत? बेसावध असताना पोर्तुगीजांनी बादशहा व त्याचे अंगरक्षक यांची कत्तल करून आपले सैन्य वसईत घुसविले. लोक सैरावैरा पळू लागले. अणजूरचे निंबाजी नाईक यांनी फार खटपट केली.

इ. स. १६८० मध्ये मराठ्यांना साष्टीकडे लक्ष देण्यास वेळच मिळाला नाही. दिल्लीहून मोगलांचे आक्रमण, विजापूर, निजाम या कोलाहलात छत्रपतींनी मराठ्यांचे राज्यस्थापनेनंतर सागरी प्रदेशाकडे लक्ष दिले. सुरतची स्वारी, कल्याणचा खजिना, कल्याणला दुर्गाडी, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग किल्ले बांधले. कुलाबकर आंग्रे तयार केले. फिरंग्याची चाहूल आधीच छत्रपति शिवाजीराजांना लागली होती. श्री. शिवाजी महाराजांना जंजिरा किल्ला जिंकता आला नाही. श्री. शिवाजी महाराजांनंतर श्री. संभाजी महाराज गादीवर आले. श्री. संभाजी महाराजांनी एकदा गोव्यावर हल्ला केला होता. तो हल्ला एवढा प्रचंड होता की पोर्तुगीज गोवा सोडण्याचा विचार करु लागले. पण महाराष्ट्राचे दुर्दैव असे की त्याच वेळेस औरंगजेब प्रचंड सैन्यानीशी दक्षिणेवर चाल करून आला. श्री. संभाजी महाराजांना गोवा मोहिम अर्धवट सोडून पुण्यास यावे लागले. त्या दरम्यान अणजूरकर निंबाजी नाईकांचे निधन झाले. श्री. छत्रपती संभाजी महाराजांच्या वधनंतर छत्रपती म्हणून शाहूमहाराज आले. शाहूमहाराजांनी दौलतीची जबाबदारी सरदार श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्यावर सोपवली.

निंबाजीच्या मृत्यूनंतर अणजूरचे गंगाजी नाईकांनी पोर्तुगीजांच्या जाचातून साष्टींची सुटका करण्याचा निश्चय केला. तेच व्रत त्यांनी अंगिकारले.

**देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।**
**मुलुख बुडवा कि बडवावा । धर्म स्थापनेसाठी ।।**

या समर्थांच्या उक्तीप्रमाणे महाराष्ट्र धर्मासाठी राष्ट्रोन्नतीसाठी त्यांनी भगिरथ प्रयत्न करून लोकजागृतीचे आंदोलन सुरू केले.

निंबाजी नाईकांना मुलगे सहा व एक मुलगी होती. निंबाजींना दोन पत्नी होत्या. पहिल्या पत्नीस एकच मुलगा झाला. त्याचे नाव शामजी नाईक. दुसऱ्या पत्नीस पाच मुलगे व एक मुलगी, अशी अपत्ये होती. १) गंगाजी, २) बुबाजी, ३) मुरारजी, ४) शिवाजी, ५) नारायणजी, ६) दिपावती. शामजी प्रथमपासून विभक्त होता. प्रथम कल्याण व लोडाणास रहात असे.

## परमेश्वराचे अधिष्ठान

**'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जे करील तयांचे। परंतु आधी भगवंताचे अधिष्ठान पाहिजे।'**

समर्थांच्या ह्या आदेशाप्रमाणे चळवळीची पराकाष्टा करण्याचे व तत्सिध्यर्थ परमेश्वराचा प्रसाद मिळविण्याचे गंगाजी नाईकांनी ठरविले. मोरगावात जाऊन सिद्धिविनायकापुढे अनुष्ठान करून त्याचा प्रसाद मिळविण्याचा निश्चय त्यांनी केला व त्याप्रमाणे आपल्या चार भावांना बजावले की परमेश्वराचा प्रसाद मिळाल्याशिवाय हे कार्य होणे दुरापास्त आहे. त्यांचे कुलदैवत श्री. सिद्धिविनायक असल्यामुळे देवाचा प्रसाद मिळविण्याकरीता मोरगावास जाण्याचे ठरवून त्याप्रमाणे इ. स. १७१८ मध्ये अणजूराहून पायी निघाले. अणजूर गाव ठाणे व भिवंडीच्यामध्ये आहे.

## पायी प्रयाण

मोरगावास जाण्यास गंगाजी नाईक पायी निघाले. त्यावेळी सर्वांनी मोठ्या प्रेमाने त्यांना निरोप दिला. अणजूर ते मोरगांव अंदाजे १४३ मैल आहे. त्यांनी आपल्या भावंडांना निर्धाराने सांगितले की, मी देहाचा संकल्प करून जात आहे. परमेश्वराने आपले पाय दाखवून सुखाचा सोहळा, महाराष्ट्र धर्माची व महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तर उत्तम, ह्या जन्मी त्याची प्राप्ती झाली नाही तर पुढील जन्मी त्याची सेवा करून हेच कार्य करीन. कार्यात यश आले तर स्वराज्याचा स्वार्थ साधेल, नाही आले तर मृत्युनंतर परमार्थ व किर्ती मिळेल. 'श्री. समर्थांनी असाच उपदेश महाराष्ट्रास केला होता. 'मरणहाक तो चुकेना।

देह वाचविता वाचेना। विवेकि होऊन समजाना। काय करावे।' जर मरण टळत नाहीतर मग मरून किर्तीरूपाने का जगू नये?

### अनुष्ठान

मोरगावास पोहचण्यास गंगाजी नाईकांना सात दिवस लागले. ह्या सातही दिवसात त्यांनी अन्नग्रहण केले नाही. मोरगावला पोहचल्यावर सतत चौदा दिवस निराहार उपोषण केले. देवाच्या सेवेकऱ्यांना फार आश्चर्य वाटले, उपोषण कशासाठी? सेवेकऱ्यांनी पृच्छा केल्यानंतर गंगाजी नाईकांनी कोकण प्रांताची दुःस्थिती निवेदन केली. फिरंग्यांनी चालविलेल्या धर्मछळाची व राजकीय जुलमांची कहाणी त्यांना सविस्तर सांगितली. आपले राज्य पोर्तुगीज अंमलाखालून सुटावे म्हणून श्री. मोरेश्वराचा प्रसाद मिळविण्याकरता आपण अनुष्ठान करत आहोत.

एकवीस दिवसांनी गंगाजीना सिद्धी मिळाली. त्यांना त्या रात्री स्वप्न पडले, तुझे मनोरथ सिद्धीस जातील. त्याच वेळी देवाचा पुजारी भगवंत गोसावी ह्यालाही स्वप्न पडले कि अनुष्ठानास बसलेल्या इसमास पारणे करावयास लावून त्यास पायतान (वहाणा, चप्पल) वाट खर्चास रुपये व समागमे गुरव देऊन त्याची बोळवण करावी. त्यावेळी जानक भारती नावाचे सिद्ध पुरुष मोरगावास होते. त्यांच्या सल्ल्याने गंगाजी नाईकांनी भगवंताचे घरी पारणे केले. भगवंत पुजाऱ्याने ठरल्याप्रमाणे त्यांना चिंचवडला पोहाचविले. मोरया गोसावींचा नातू नारायण देव यांनी आपला वडील मुलगा चिंतामणी देव यांचे हस्ते नाईकांना अनुग्रह दिला.

चिंतामणी देव यांनी स्वतःच्या लहानपणीचा पुजेतला उजव्या सोंडेचा देव सिद्धीविनायक गंगाजीना प्रसाद म्हणून दिला. प्रसाद घेऊन गंगाजी नाईक अणजूरास आले. हल्ली ती प्रसाद मूर्ती अणजूर येथे माडीत प्रतिष्ठित आहे. त्यावेळी गंगाजीना प्रसादाची एक तलवारसुद्धा मिळाली होती.

## प्रतिष्ठापना व कार्यास प्रारंभ

घरी येताच गंगाजींनी प्रसादमूर्तीची प्रतिष्ठापना केली व आपल्या सर्व भावांना परमेश्वराच्या कृपेची हकिकत निवेदन केली. बुवाजी नाईकांनी कार्यास सुरवात करण्याचा निर्धार जाहीर केला. सर्व कारभारी मंडळींनी साष्ठितल्या सर्व ज्ञातीत आपल्या कार्याचा पुरस्कार व प्रसार केला. सर्व प्रांतात उत्तम प्रकारची संघटना केली. आतून इतकी तयारी केल्यानंतरच बाहेरची मदत मिळविण्याच्या प्रयत्नास त्यांनी सुरवात केली. इ. स. १७१८मध्ये गंगाजी नाईक कुलाब्यास जाऊन कान्होजी आंग्रे यांना भेटले. त्यांना कार्याचे महत्व समजावून दिले. पण कान्होजी आंग्रे असमर्थ होते. तेच मुळी जंजिऱ्याचा हाबसी, डच, गोव्याचे पोर्तुगीज व मुंबईचे ब्रिटीश या चारजणांबरोबर सागरी लढ्यात गुंतले होते. कधी आक्रमण होईल याचा नेम नसे. म्हणून त्यांनी असमर्थता व्यक्त केली. सिंधूदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी, उंदेरी, कुलाबा सुरक्षित ठेवावी लागत असे. आंग्रे सरकारची असमर्थता समजताच गंगाजी नाईक व बुवाजी नाईक कामास लागले. सर्व सगेसोयरे आपले भाऊ यांचे युद्धमंडळ स्थापन केले. गंगाजी नाईक यांना मदत देणाऱ्या जमाती १) पाठारे क्षत्रिय, २) शुक्ल यजुर्वेदिय माध्यंदिन ब्राह्मण, ३) पाठारे प्रभु, ४) चांद्रसेनिय कायस्थ प्रभू, ५) मराठे, ६) सोमवंशी क्षत्रिय, ७) भंडारी, ८) कोळी, ९) आगरी, १०) मुसलमान, ११) किरीस्ताव आणि इतर जमातींनीही मदत केली.

गंगाजी नाईक फिरंग्यांचे राज्य घेण्याचे खटपट करीत आहेत व त्याकरिता कुलाब्यास जाऊन आंग्र्यांना भेटून आले, असा सुगावा फिरंग्यांना लागला. त्यांनी गंगाजी नाईकांना घरी येताच पकडून तुरुंगात टाकले. त्यावेळी फिरंग्यांना पाचशे रुपये दंड देऊन व लाच भरून नाईकांनी स्वतःची मुक्तता करून घेतली हा तुरुंगवास नाईकांना इ. स. १७१९ मध्ये घडला.

त्या नंतर बुवाजी नाईक पंढरपूरास गेले. त्यांनी फिरंग्यांच्या जुलमाची कहाणी त्यांचे गुरु तुकाराम महाराजांचे तिसरे पुत्र नारोबा गोसावी यांना निवेदन

केली. इ. स. १७२० आषाढी यात्रेच्यावेळी नारोबा गोसावी यांनी खंडेराव दाभाडे व बुवाजी नाईक ह्यांची ओळख करून दिली. बुवाजीनी फिरंग्यांच्या जुलमाची कहाणी दाभाडयांच्या कानावर घातली. दाभाड्यांनी मदत करण्याचे कबूल केले. अश्विन महिन्यात फौज आणण्याचे ठरले. मुलखाचा कारभार नाईकांनीच चालवावा फक्त आमचे निशाण पत्करावे एवढेच दाभाड्यांनी सांगितले. त्याप्रमाणे गंगाजी नाईकांनी आपले मदतनीस बोलावून लागभाग ठीक केले.

### पहिल्या संग्रामाचे पहिले हुतात्मे

पंतांनी सुचवल्यावरून इ. स. १७२२ मध्ये मोहिमेच्या खर्चाकरिता साष्टीहून एक लाख रुपये मिळविण्याचा इरादा करून गंगाजी नाईकांनी साष्टीत प्रवेश केला, मरोळला श्रीमंत पाद्री रहात होते. त्यांनी मरोळची माडी फोडून लुटण्याचे ठरविले. स्वतः चे पचास माणूस व पंतांचे पन्नास माणूस बरोबर घेतले. हा बेत फिरंग्यांना कळल्यामुळे घोडबंदरपासून ठाण्याचे पाणबुरुजापर्यंत तारफांचा वेढा घालून फिरंग्यांनी गंगाजीना साष्टीत कोंडले. सहाव्या रात्री हबाजी हिंदूराव व जिवाजी भालेराव ह्यांनी मचवे वाळकूमचे खाडीत घालून गंगाजी व त्यांची माणसे खाडीपार उतरली. नामजी देसाई, बापूजी ठाकूर, बापूजी गोरेगांवकर ह्यांनी ह्या प्रसंगी फार मोठी मदत केली. ह्यामुळे चिडून फिरंग्यांनी गंगाजी नाईकांने सगेसोयरे व मित्र मिळून दोनशे माणूस पकडून बंदीत टाकले. लोकांना चार महिने तुरुंगात काढावे लागले. तेवढ्यात दंड वगैरे भरून लोकांनी सुटका करून घेतली.

वर उल्लेखिलेल्या दोनशे लोकांपैकी रुपजी भालेराव, नारोजी भालेराव, तानकोजी भालेराव यांना फिरंग्यांनी अन्यायी ठरविले, गोव्यास नेले, त्यांच्या अंगावर तेलाची डगली पासून त्यांना जिवंत जाळले. ह्या आपत्तीनंतर इ.स. १७२२ साली गंगाजी नाईक आपल्या सर्व भावांसह सातार्‍यास गेले. बाजीराव न चिमाजी पेशव्यांची भेट घेऊन कोकणातल्या कहराची करूण कहाणी त्यांच्या

कानावर घातली. फिरंग्यांच्या सर्व प्रकारच्या जुलमांतून साष्ठी प्रांत त्वरीत सोडवून स्वराज्याची व स्वधर्माची स्थापना करावी अशी फार आग्रहाची विनंती त्यांनी पेशव्यांना केली.

इ.स. १७२६ मध्ये गंगाजी नाईक पुढील तरतूदीकरीता बाजीरावांना भेटण्यासाठी जुन्नरला गेले. मनसुब्याचा ठराव झाला. सरदारांच्या व फौजेच्या नेमणुका झाल्या, पण त्या वर्षी श्रीरंगपट्टणावरील मोहिम करण्याचे ठरल्यामुळे कोकणातील स्वारीचा बेत रहित करण्यात आला. इ.स. १७२८ मध्ये रामचंद्रांचे निधन झाले व कृष्णराव महादेव कल्याणचे सुभेदार झाले ही उलथापालथ फिरंग्यांनी ओळखून व मोहिमेची दिरंगाई जाणून इ.स. १७२८ च्या पावसाळ्याच्या प्रारंभी कल्याणवर हल्ला केला. कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्यावर फार मोठी हातघाईची लढाई झाली. शिवाजी नाईक, नारायणजी नाईक ह्यांनी किल्ल्यातून फिरंग्यांवर चार स्वाऱ्या केल्या. गंगाजी नाईक लोनाडहून येऊन कल्याणचे कोटावर चढले. कोटाच्या तोफा दुर्गाडीवर नेल्या व फिरंग्यांवर भयंकर मारा केला. रामचंद्रपंतांची बायको जानकीबाई हिने आपल्या गोट वेळा तोडून शिपाई बरकंदाज ह्यांना बक्षिसे दिली. फिरंगी तारवांत बसून पळून गेला. एवढे झाले तरी पुढे कृष्णरावांचे कारकुनांनी फिरंग्यांचे बरोबर गोडी ठेवली. त्यामुळे फिरंग्यांनी इ.स. १७३० मध्ये पुन्हा कल्याणची मागणी केली.

## पेशव्यांची भेट

इ.स. १७३३ मध्ये बाजीराव कुलाब्यास आले असताना गंगाजी नाईक त्यांना भेटण्यास गेले. सर्व परिस्थिती त्यांना समजावून सांगण्यात आली. परंतु सिद्धीच्या स्वारीमुळे ह्याही वर्षी हल्ल्याचे काम राहिले. पोर्तुगीज फिरंग्यांना सुगावा लागलाच होता त्यांनी विचार केला, लोक बाटवले व ठाण्यात भुईकोट किल्ला बांधला, धर्मछळ सुरू झाला, चेंदणी कोळीवाडयात तर कहरच केला. आजुबाजुच्या गावात आकांत उडाला. शांत विस्तीर्ण असे तलाव व त्यांच्या काठाशी असलेली देवालये ठाण्याने भूषण होते, पोर्तुगीजांनी जवळजवळ बारा

देवालये निर्दयपणे जमीनदोस्त केली. सुंदर मुर्ती अजूनही तलावाच्या तळाशी पडून आहेत. या मंदिराचे अवशेष वापरून १६६३ मध्ये बाप्टिस चर्च बांधण्यात आले. हिंदुस्थानातील सर्वांत मोठी घंटा या चर्चच्या ७२ फूट उंच सौध्याला लटकते आहे.

१६६६ मध्ये मराठांनी ठाण्याचा ईशान्य प्रदेश जिंकला व पोर्तुगीजांना वचक बसावा म्हणून मराठा आरमाराचे महागिरी जहाज ठाणे खाडीत नांगरण्यात आले. या जहाजाच्या नावावरून आसपासच्या कोळी वस्तीला महागिरी असे नाव पडले. ठाण्याचा भुईकोट किल्ला बांधायला १७३० मध्ये सुरुवात झाली.

**ठाण्याचा किल्ला**

मराठे पोर्तुगीज संघर्ष ठाण्यामध्ये निराला पोहचला तो पेशवाईत मराठा राज्याची चहू दिशांना होणारी घोडदौड पाहून पोर्तुगीजांनी धसका घेतला होता. नजीकच्या काळात मराठ्यांशी मोठया प्रमाणावर रणसंग्राम करावा लागणार याची त्यांना कल्पना आली. त्यादृष्टीने किल्ला लवकरात लवकर बांधण्यास सुरुवात केली. रयतेचा अतोनात छळ करून, जुलूम जबरदस्तीने काम करवून तसेच खंडणी उकळून पाच बुरुजांचा भक्कम कोट १७३४ मध्ये तयार झाला. आजचा मुंबई-पुणे रस्ता, ठाणे खाडीपुल ओलांडून जातो. पुढे कळवा गाव लागते. येथे हा किल्ला आहे.

जोसे, ज्योआओ आणि मार्शल हे तीन बुरुज फार मोठे व मजबूत आहेत. दगडी तटबंदी उभारता उभारता पोर्तुगीज अंमलदार रयतेच्या मनातले सिंहासन मात्र गमावून बसले होते. त्याचाच फायदा मराठांना झाला.

गंगाजी नाईक पुण्यास गेले. आप्पासाहेबांना समजावून दिले कि ठाण्याचा कोट पुरा झाल्यावर फिरंगी अजिंक्य होईल. यंदा या मोहिमेत सुरुवात करीत नसाल तर कायमचा निरोप द्यावा. ह्या मनसुब्यामुळे माझे सर्वस्व गेले आहे.

आणि कार्य तसेच राहिले आहे. अशी कळकळीची विनवणी केल्यानंतर श्रीमंत बाजीराव पेशव्यांना हा मनसुवा हाती घेण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. तेव्हा चिमाजी आप्पाला या मोहिमेची मसलत सांगून बाजीराव उत्तरेकडे गेले.

गंगाजी पुण्यास तीन महिने होते. चिमाजी आप्पांनी सर्व सरदार जमा केले त्यांना वेगवेगळी कामे वाटून दिली. इ.स. १७३७ चैत्र महिना स्वारीसाठी कायम केला. पुढील सिद्धतेकरीता गंगाजीना पुण्याहून कल्याणास पाठविले. त्यांनी कल्याणास कमालीचा गोंधळ घातला व त्या निमित्ताने त्यांनी सर्व सहकारी जमा केले. त्यांना निरनिराळी कामे वाटून दिली. त्यांची नावे नामजी देशमुख, भिकाजी हैबतराव, मालजी जित, हिराजी ठाकूर, मुन्हाजी मठाकर, बसबूजी गोरेगांवकर, जसवंतजी दहीसरकर, लक्ष्मणजी राऊत, कलपेकर, हाशा कोळी, कोळी बांधव, गणेशजी व रघुजी वसईकर, लखम चौधरी, खंडोजी लोढया.

चैत्र शुद्ध सप्तमीस मुक्काम केला. एक फौज माहुली किल्ल्याखाली जमा व्हावी व दुसरी फौज राजमाची किल्ल्याखाली जमा व्हावी असे ठरले. पण बुवाजी नाईकांनी प्रतिज्ञा केली व स्वतःवर आईची आण (शपथ) घालून स्वतःच एकटेच पुढे निघाले. त्यांचे म्हणणे की, ठरल्याप्रमाणे गंगाजी नाईक वसईवर उतरतील. आपला दिवस चुकेल त्यामुळे अर्थातच वस्ती न करता फौज तशीच पुढे गेली. बुवाजी बरोबर मुरारजी, नारायणजी व कृष्णाजी नाईक होते.

राजमाचीपासून दबा धरीत सैन्य कळव्यास आले. घटकाभर विश्रांती घेतली. २६ मार्च १७३७. बुवाजी नाईकांनी पोर्तुगीजांना किंचितही हालचाल करण्याची संधी न देता ताबडतोब हल्ला करावा अशी योजना तयार झाली. ठाण्याचे स्थानिक कोळी आगरी इतर जातीचे लोकही मराठ्यांना सामील झाले. कळव्याजवळच्या जेरो निमो पाणबुरुजावरील टेहळण्यांना दारू पाजून गाफिल ठेवण्यात आले. तोपर्यंत बुरुजाला शिड्या लावून मराठे बुरुजावर चढले. छोटयाश्या चकमकीत एक कप्तान व सहा शिपाई मराठयांनी कापून काढले.

बुरुज सर झाल्याचा इशारा तोफेच्या आवाजानेच दिला गेला.

तोफांच्या आवाजानेच गव्हर्नर बलो खडबडून जागा झाला. मराठयांच्या हालचालीची बातमी सर्वमुखी होऊनही तो फारसा तयारीत नव्हता. परंतू तोफांचे आवाज ऐकताच त्याने सार्जंट मेजरच्या हाताखाली एक तुकडी पाणबुरुजाकडे पाठवली. पण मराठयांनी ती तुकडी अख्खीच्या अख्खी कैद केली. २६ मार्चची रात्र. मराठयांनी विजयाच्या उन्मादात जागवली. २७ मार्चची सकाळ पोर्तुगीजांसाठी स्वप्नाहूनही भयानक वास्तव घेऊनच उगवली. मराठी सेना साष्टीत जिकडे तिकडे घुसली होती. ठाण्याच्या कोटाला घट्ट वेढा बसला होता. मोक्याच्या जागा रोखून धरण्यात आल्या होत्या. साष्टीत मराठी सैन्य ओलांडून मुंगीचाही शिरकाव झाला नसता. गव्हर्नर बतेलोने कौन्सिल भरविले. सहा शिपाई कंपन्या व एतद्देशीय लोकांच्या सहाय्याने निकराचा लढा देण्याचे त्याने ठरविले. पण त्याच्या इतर अधिकाऱ्यांनी याला संमती दिली नाही. आत्ता पुरते जेरबंद होण्याआधी किल्ल्याबाहेर पळून जाणे एवढाच मार्ग खुला होता. २७ मार्चला गव्हर्नरने कोट सोडला. त्याच्या पावलावर पाऊल टाकून सर्व सैनिक पळून गेले.

श्रीमंत पेशवे चिमाजी अप्पांनी स्वतः ठाण्यास येऊन चौकी पहाऱ्यांचा चोख बंदोबस्त केला. २९ मार्चला पहाटे मराठ्याचा जरीपटका ठाण्याच्या किल्ल्यावर डौलाने फडकू लागला. मराठयांना किल्ल्यात ३५ तोफा, बुरुजांवर २८ आणि २ गलबते व त्यावरील १६ तोफा मराठ्यांना मिळाल्या. ज्या पाणबुरुजावरील चढाईने मोहिम फत्ते झाली त्याचे नाव फत्ते बुरुज असे ठेवले. चिमाजी अप्पांनी बुवाजी नाईक व मुरारजी नाईक बंधू यांचा गौरव केला. ठाण्याची मोहिम पार पडली. त्या बुवाजी नाईकांना आजची कलेक्टर कचेरी ते पेढ्या मारुती मंदिरापर्यंतची जमीन इनाम म्हणून मिळाली. काही कर वसूलीचे हक्कही त्यांना प्रदान करण्यात आले. ठाण्यातील मराठी हिंदू जनतेत मराठी सत्तेबद्दल अपार विश्वास होताच. त्याचवेळी ठाण्यातील किरीस्ताव रयतेलाही दिलासा मिळाला

की मराठी अंमलात त्यांच्या धर्म कृत्यांवर कोणतीही आडकाठी येणार नाही. उत्तर कोकण विजयाप्रत्यर्थ चिमाजी अप्पांनी कौपिनेश्वर मंदिरात रुद्र करविला त्यावेळचे घंटा नाद आणि मंत्रघोष अजूनही या तळ्याच्या हृदयात गुंजत आहेत.

बाळाजी बाजीरावांच्या काळात रामजी बिवलकर यांना ठाणे-सुभेदार नेमले. बिवलकरांनी ठाण्याचा कायापालट केला. पेशव्यांच्यावतीने सुभेदार ठाण्याचा कारभार पाहू लागले. त्यांनी वाडा बांधला तो अस्सल पेशवाई थाटाचा होता. पुढे वाडयाचे ब्रिटीश काळात कोर्टात रुपांतर झाले.

## वसईची मोहिम सुरू

इ.स. १७३७ पासून मराठ्यांना विजय मिळू लागला. फिरंग्यांच्यावर मराठ्यांची संक्रांत वळली. मुसलमान मराठ्यांपुढे नामोहरम झाले. हबशी आंग्र्यांच्या व पेशव्यांच्या मर्दुमकीमुळे हातपाय जोडून स्वस्थ बसले. इंग्रज व पोर्तुगीजांना सरखेल कान्होजी आंग्र्यांनी नको नको केले. हिंदूविरुद्ध किरीस्ताव सागरी साम्राज्याचे धनी. आधुनीक शस्त्रे, तोफा, सैनिक, युद्ध नौका याने समृद्ध अशी वसईची मोहीम होती. पेशव्यांचा तळ वज्रेश्वरी-गणेशपुरीपर्यंत पडला होता.

श्रीमंत चिमाजीअप्पांनी श्री. वज्रेश्वरी देवीला नवस केला. जगदंबे वज्रेश्वरी आई फिरंग्यांचा वसई किल्ला सर करण्यात मला यश दे. मी तुझे देऊळ किल्ल्यासारखे बांधीन. रात्री दृष्टांत झाला की ज्याबाजूने कबूतरांचा थवा किल्ल्याकडून येईल त्याबाजूने हल्ला केल्यास निश्चितपणे यश मिळेल. गुंजकाटईच्या देवळात थोर संत गोधडेबुवा भेटले. त्यांचाही आशिर्वाद मिळाला. वसईचा किल्ला अत्यंत मजबूत, अजिंक्य. त्याची संरक्षण व्यवस्था अगदी अप्रतिम, उत्तम तोफा बुरुजावर, दारुगोळा विपुल प्रमाणात असल्याने हा किल्ला दुर्भेद्य आहे. याचा विश्वास तेथल्या दुर्गाधिपतीला होता.

दि. १ मे १७३९ रोजी वसई किल्ल्यावरील हल्ल्यास सुरूवात झाली. सुरुंग उडू लागले. फिरंग्यांचे लोक चार कोसावर उतरले असता कृष्णाजी नाईकांनी त्यांची कत्तल केली. शिरे कापून ठाण्यास पाठविली. ३ मे रोजी पश्चिमेचा सुरुंग

उडाला. सर्व सैन्य उठाव करून हल्ला केला. मोठा गिलका झाला. सुरुंगाने मोठे खिंडार पडले. मराठ्यांनी निकराचा हल्ला केला. सर्व फौजा पायउतार झाल्या. मराठा फौज सर्व ज्ञातीतील सैनिक कोटास भिडले. एकंदर ४००० सैन्य कामास आले. मुरारजी नाईक पडले. चिमाजी अप्पांना अपरंपार दुःख झाले. त्यांचे शव गंगाजी नाईकांनी काढले. सर्व नाईकबंधु कष्टी झाले. पण युद्धात कुणीही कसूर केली नाही. रॉबेस्टीयन आणि रेमिडोओज या दोन बुरुजांना खिंडार पडल्याने मराठा सेना विजयी मुद्रेत कोटात शिरली.

पेशव्यांच्या सतत हल्ल्यामुळेच फिरंगी हैराण झाले. पटापट फिरंगी मरु लागले. हल्ला कसा थांबवणार? हाच प्रश्न फिरंग्यांना पडला. गोव्याची व मुंबईची रसद आंग्र्यांनी येऊ दिली नाही. उलट आंग्र्यांचा हल्ला अलिबागहून आला आणि फिरंग्यांच्या जहाजावर तुटून पडला. जहाजे जप्त केली.

फिरंग्यांना अगदी अशक्य झाल्यामुळे वैशाख शुद्ध नवमी शके १६६१ दिनांक ५ मे १७३९ रोजी किल्ला खाली करवून दिला. मराठ्यांचा जरीपटका दुपारी किल्ल्यावर फडकवला. अशा रीतीने ह्या महायुद्धाचा शेवट गंगाजी नाईकांच्या इच्छेप्रमाणे गोड झाला. २० वर्ष फिरंग्यांच्या धर्मछळाचा नायनाट करण्याचा संकल्प पूर्ण झाला.

वसईच्या घनघोर रमसंग्रामाची आठवण नाही असा महाराष्ट्रीय विरळा. युरोप खंडातील देशांचे आशिया खंडातील देशांवर आक्रमण सुरू झाल्यापासून प्रथम जर कुणी पाश्चात्य राष्ट्रांचा निःपात करणारा पराभव केला असेल तर तो महाराष्ट्रातील मराठ्यांनी होय. जपानने रशियाचा पराभव इ.स. १९०५ साली केला. परंतु पाक्षात्यांचा पराभव करण्याचा पहिला मान मराठयांनी इ.स. १७३९ मध्ये मिळविला आहे. पोर्तुगीज लोकांनी कोकण प्रांतात विशेषतः गोमांतक प्रांत व साष्ठी प्रांत यामध्ये जे धार्मिक अत्याचार केले तसे अन्यत्र सापडणे कठीण. पोर्तुगीज लोक त्यातही नवीन शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेले व पाश्चात्य पद्धतीचे कवायती सैन्य बाळगणारे. म्हणून मराठ्यांनी इ.स. १७३९ मध्ये वसईवर जो प्रचंड विजय मिळविला त्याचे महत्व युगपरिवर्तनाइतके आहे. त्यायोगे


पोर्तुगीजांच्या हिंदुस्थानमधील सत्तेचे कंबरडेच मोडले व पोर्तुगीजांचे सत्तायुग अस्तंगत झाले. अशा या विजयासंबंधी कुणा महाराष्ट्रीयास सार्थ अभिमान वाटणार नाही का?

**श्री. हरीभाऊ शेजवळ**

अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर इतिहास संशोधक समिती ठाणे.

संदर्भ :- १) साष्टीची बखर - काका नाईक.
२) ऐतिहासिक ठाणे - देवल
३) काका नाईक चरित्र - पाठारे
४) कुलावकर आंग्रे - ढबू
५) श्री. वज्रेश्वरी योगिनीदेवी - विनायक (गुरुजी)
६) वसईचा रणसंग्राम - दामले.
७) ठाणे नगरपालिका शताब्दी ग्रंथ.

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**



**श्रीमंत पेशवे चिमाजीअप्पांनी बांधलेले श्री. वज्रेश्वरी मंदिर**